# देगलूर महाविद्यालयाला मैदानी स्पर्धेत सुवर्ण पदक

**देगलूर / प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,अर्धापूर आयोजित नांदेड येथे दि.१० ऑक्टोंबर मंगळवार व ११ ऑक्टोंबर बुधवार रोजी आयोजित आंतर महाविद्यालयीन विद्यापीठीय मैदानी स्पर्धेत अ, ब,क,आणि ड विभागातील खेळाडूंनी सहभाग नोंदविला यातून ब विभाग मधून देगलूर महाविद्यालयातील तीन खेळाडुंनी स्वा.रा.ती.म. विद्यापीठ,नांदेड मधून कू.गुडूप शिवरानी ने ४०० मी धावणे मध्ये सुवर्ण पदक,२०० मी रजत तर ४ बाय १०० मी व ४ बाय ४०० मी रिले मध्ये सुवर्ण पदक तसेच कोडमुंजा नेहा या खेळाडूने ४ बाय ४०० मी रिले मध्ये सुवर्ण पदक तर हिरेवाड बालाजी याने १०० मी मध्ये कांस्य पदक व ४ बाय १०० मी रिलेमध्ये कांस्य पदक पटकावत देगलुर महाविद्यालयाची यशस्वी परंपरा विद्यापीठात कायम ठेवली आहे.या यशाबदल



अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार ,उपाध्यक्ष नारायणराव मैलागिरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ कर्मवीर उनग्रतवार , जनार्दन चिद्रावार ,गंगाधर जोशी, रवींद्र द्याडे,देवेन्द्र मोतेवार , चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. मोहन खताळ ,उपप्राचार्य डॉ अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे , पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील , कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी नळगीरकर,प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी कौतुक केले आहे.

Scanned with OKEN Scanner